प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

लोकमत

**१६० स्वयंसेवकांनी घेतला सहभाग : परिसरातून प्लॅस्टिक बाटल्या, पिशव्या केल्या जमा**

# राजगुरु महाविद्यालयाचे वनसचेतन शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**दावडी :** राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भोरगिरी ते भीमाशंकर अभयारण्य परिसरात शनिवारी वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले.

या वेळी सुमारे १६० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला होता. शिबिराचे हे सलग सातवे वर्ष होते. विद्यार्थ्यांना निसर्गातील जैवविविधतेची माहिती व्हावी तसेच पर्यटकांकडून अभयारण्य परिसरात टाकला जाणारा प्लास्टिकचा कचरा जमा करावा, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू होता. विद्यार्थ्यांनी अभयारण्य परिसरात भटकंती करुन शेकरु प्राणी व ब्रूमॉरमॉन फुलपाखराची ओळख तसेच दुर्मीळ औषधी वनस्पती, प्राणी यांच्या जाती-प्रजातींची माहिती करून घेतली. भीमाशंकर अभयारण्य व मंदिर परिसरातील प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या इत्यादी घनकचरा जमा केला. भोरगिरी-भीमाशंकर असे १२ किमीचे पदभ्रमण करण्यात आले. डोंगरधारेजवळून जाताना असंख्य धबधबे आणि रानफुले पाहण्याचा आनंद विद्यार्थ्यांनी घेतला.



भीमाशंकर मंदिर परिसरात पर्यावरणरक्षण, प्लॅस्टिकमुक्ती व स्वच्छतेचे महत्त्व सांगणारे पथनाट्य सादर केले.

रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी विद्यार्थ्यांना सह्याद्रीच्या डोंगररांगांची प्राकृतिक रचना, हवामान, मृदा, जलप्रणाली आणि भीमाशंकर अभयारण्य व मंदिर परिसराची धार्मिक व ऐतिहासिक माहिती दिली. तर प्रा. योगेश वाळुंज यांनी मानवी जीवनात स्वच्छ व शुद्ध पाण्याचे महत्त्व सांगून जलजन्य आजार व त्यास प्रतिबंध करण्यासाठी पाणी गुणवत्तेबाबतची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी भीमाशंकर मंदिर परिसरात पर्यावरणरक्षण, प्लास्टिकमुक्ती व स्वच्छतेचे महत्त्व सांगणारे पथनाट्य सादर केले.

या उपक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ एच. एम. जरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज यांनी केले. या शिबिरात प्रा. गणेश धुमाळ, प्रा. नीलेश बारणे, प्रा. संतोष कारले, प्रा.आरती वाळुंज, प्रा. सुप्रिया राक्षे, प्रा.काजल शहा, प्रा.जयश्री जासूद, अमोल बारणे, गणेश म्हसे यांनी सहभाग घेतला.

Hello Pune Gramin
Page No. 5 Sep 10, 2019
Powered by: erelego.com



भोरगिरी-भीमाशंकर येथे वनसचेतन शिबिरात सहभागी झालेले विद्यार्थी व विद्यार्थिनी.

# भीमाशंकर अभयारण्य परिसरात स्वच्छता

**चास :** भोरगिरी ते भीमाशंकर अभयारण्य परिसरात वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियान राबविले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे शनिवारी (दि. ७) हा उपक्रम राबविला. यात सुमारे १६० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांना निसर्गातील जैवविविधतेची माहिती होण्यासाठी भोरगिरी-भीमाशंकर-भोरगिरी असे १२ किलोमीटरचे यावेळी पदभ्रमण केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळुक यांनी विद्यार्थ्यांना सह्याद्रीच्या डोंगररांगांची प्राकृतिक रचना, हवामान, मृदा, जलप्रणाली आणि भीमाशंकर अभयारण्य व मंदिर परिसराची धार्मिक व ऐतिहासिक माहिती दिली. प्रा. योगेश वाळुंज यांनी मानवी जीवनात स्वच्छ व शुद्ध पाण्याचे महत्त्व सांगून जलजन्य आजार व त्यास प्रतिबंध करण्यासाठी पाणी गुणवत्तेबाबतची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षण, प्लास्टिकमुक्ती व स्वच्छतेचे महत्त्व सांगणारे पथनाट्य सादर केले. या वेळी उपस्थितांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. विद्यार्थ्यांनी अभयारण्य परिसरात वनभोजन घेतले. याचे आयोजन प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळुक, प्रा. योगेश वाळुंज यांनी केले. प्रा. गणेश धुमाळ, प्रा. नीलेश बारणे, प्रा. संतोष कारले, प्रा. आरती वाळुंज, प्रा. सुप्रिया राक्षे, प्रा. काजल शहा, प्रा. जयश्री जासूद, सेवक अमोल बारणे, गणेश म्हसे यांनी सहभाग घेतला.



**भीमाशंकर :** येथे अभयारण्य परिसरात वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियानात १६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# विद्यार्थ्यांचे भीमाशंकर अभयारण्यात सचेतना शिबिर

**राजगुरुनगर, दि. ८ (प्रतिनिधी)** - येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भोरगिरी ते भीमाशंकर अभयारण्य परिसरात वनसचेतन शिबीर व स्वच्छता अभियानाचे आयोजन शनिवारी (दि. ७) करण्यात आले. यात सुमारे १६० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. शिबिराचे हे सलग सातवे वर्ष होते.

विद्यार्थ्यांना निसर्गातील जैवविविधतेची माहिती व्हावी तसेच पर्यटकांकडून अभयारण्य परिसरात टाकला जाणारा प्लुस्टिकचा कचरा जमा करावा हा या उपक्रमामागील मुख्य हेतू होता. विद्यार्थ्यांनी अभयारण्य परिसरात भटकंती करून शेकरू प्राणी व ब्लूमॉरमॉन फुलपाखराची ओळख तसेच दुर्मीळ औषधी वनस्पती, प्राणी यांच्या जाती - प्रजातींची माहिती करून घेतली. भीमाशंकर अभयारण्य व मंदिर परिसरातील प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या इत्यादि घनकचरा जमा केला. भोरगिरी-भीमाशंकर- भोरगिरी असे १२ किमीचे पदभ्रमण करण्यात आले. डोंगरधारेजवळून जाताना असंख्य धबधबे आणि रानफुले पाहण्याचा आनंद विद्यार्थ्यांनी घेतला.

या उपक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज यांनी केले.

प्रभात Mon, 09 September 2019
epaper.eprabhat.net/c/43396690




सकाळ

# भोरगिरीत विद्यार्थ्यांचे शिबिर



भीमाशंकर अभयारण्य (ता. खेड) : वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियानात सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक.

**चास, ता. ९ :** राजगुरूनगर (ता. खेड) येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे भोरगिरी ते भीमाशंकर अभयारण्य परिसरात वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियानाचे आयोजन नुकतेच करण्यात आले. या उपक्रमात १६० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी विद्यार्थ्यांना सह्याद्रीच्या डोंगररांगांची प्राकृतिक रचना, हवामान, मृदा, जलप्रणाली आणि भीमाशंकर अभयारण्य व मंदिर परिसराची धार्मिक व ऐतिहासिक माहिती दिली. प्रा. योगेश वाळुंज यांनी पाण्याच्या स्वच्छतेविषयी माहिती दिली.

या उपक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज यांनी केले. या शिबिरात प्रा. गणेश धुमाळ, प्रा. नीलेश बारणे, प्रा. संतोष कारले, प्रा. आरती वाळुंज, प्रा. सुप्रिया राक्षे, प्रा. काजल शहा, प्रा. जयश्री जासूद, अमोल बारणे, गणेश म्हसे यांनी सहभाग घेतला.

Pune, District-Today
10/09/2019 Page No. 4

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख